# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

विचारांती लिहिण्याची बाबच खरंतर लेखनातल्या सगळ्या लेखकांच्या मागे असते. “उचलली जीभ, लावली टाळ्याला” म्हणतात तसे “उचललं पेन लावलं कागदाला” असे करता येत नाही. सुरुवात कुठून करायची हा प्रश्न कायमच सतावत राहतो. सुरुवात मनासारखी झाली, तरी मध्येमध्ये गाडी अडते. चांगला शेवट करण तर मोठं आव्हानच वाटत. मनापासून लिहायचं असेल, तर हात जास्त वापरावा लागत नाही. बुद्धी, विचारशक्ती जास्त वापरावी लागते. त्याचा शीण जास्त येतो. लिहिणारा हात राबू नये, म्हणून आपण बुद्धी जास्त राबवतो.

तरीही बुद्धीची शिस्त, मनाची शिस्त, नेमकेपणा, मुद्देसूदपणा हे गुण अंगी बाळगायचे असतील, तर लिहिण्याच्या सरावाला पर्याय नाही.

मी आकाशवाणीसाठी प्रसंगोपात पुष्कळ लिहिले. त्याचा मला खूप फायदा झाला. आपले एखादे म्हणणे किंवा एखादा मुद्दा बारा, सोळा, किंवा तीस मिनिटांमध्ये मांडायचा असेल, तर त्यातले प्रत्येक मिनिट काटकसरीने वापरायला हवे. प्रत्येक शब्द कसा त्याच्या जागी तोच हवा. सुरुवातीला हे जमवायला त्रास पडला. वेळ संपून गेला, तरी मुद्दा मागेच राहिला असेही अनुभव आले, पण हळूहळू लिहिलेल्या शब्दांवर माझी हुकूमत यायला लागली.

---